## <u>निशाणी क्र. ३६ वरील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज व त्यावरील प्रतिवादी यांचे म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादी यांचे सुविद्य विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

२. प्रस्तुत अर्जाव्दारे वादीने विनंती केली आहे की, प्रतिवादी क्र. ३ नामे लिंबाजी लक्ष्मण भांगे हे दि. ३०/१२/२०२४ रोजी मयत झाले आहेत. सदर प्रतिवादीविरुध्द वादीची कोणतीही मागणी शिल्लक राहिली नाही. त्यामुळे, सदर प्रतिवादी क्र. ३ चे नाव दाव्यातून वगळयाची परवानगी द्यावी. प्रतिवादीने अर्जास म्हणणे सादर करुन प्रस्तुत अर्ज मुदतीत दाखल केला नाही. प्रतिवादी क्र. ३ विरुध्द दावा अबेट झाला आहे त्यामुळे त्यास दाव्यातून कमी करण्याची तरतूद नाही. त्यामुळे, अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

३. वादीने कनथाचे पुष्टयर्थ प्रतिवादी क्र. ३ नामे लिंबाजी लक्ष्मण भांगे यांचे मृत्यू प्रमाणपत्र दाखल केले आहे. सदर मृत्यू प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता सदर प्रतिवादी क्र. ३ दि. ३०/१२/२०२४ रोजी मयत झाले असल्याचे दिसून येते. सदर प्रतिवादी मयत झाल्याने सदर प्रतिवादीविरुध्द दावा अबेट झाला असून आता प्रतिवादी हयात नसताना त्याचे नाव वगळण्याची परवानगी देणे संयुक्तिक होणार नाही. सबब, अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे.

## <u>आदेश</u>

सदरचा अर्ज नामंजुर करण्यात येतो.

ANAY DNYANESH KULKARNI
Digitally signed by ANAY DNYANESH KULKARNI
Date: 2025.09.20 17:12:55 +0530

दिनांक – २०/०९/२०२५ **(अनय ज्ञा. कुलकर्णी)**

तिसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
माढा

| **CERTIFICATE** | | |
|---|---|---|
| I affirm that, the contents of this P.D.F. file Order/Judgment is same word to word, as per the original order/judgment. | | |
| Name of Stenographer | : | M.P.Dixit Grade-3 |
| Court Name | : | Shri. A. D. Kulkarni<br>3rd Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Madha. |
| Order/Judgment signed by the Presiding Officer on | : | 20/09/2025 |
| Order/Judgment uploaded on | : | 22/09/2025 |